

**उद्योगपती मदनमोहन लोहिया यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त कोल्हापुरात गुरुवारी झालेल्या समारंभात त्यांना मानपत्र अर्पण करताना ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर. शेजारी व्ही. टी. पाटील.**

# सच्चा समाजसेवकाची आज समाजास गरज-कानेटकर

**कोल्हापूर, ता. १८ - 'सच्चा समाजसेवकाची यापूर्वी कधी नव्हती इतकी गरज आज समाजास भासते आहे. समाजातील सेवाव्रताची भावना संपली आहे. माणसासह सर्वच गोष्टी विकाऊ बनल्या आहेत,' अशी खंत प्रसिद्ध नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांनी व्यक्त केली.**

उद्योगपती मदनमोहन लोहिया यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सत्कार समारंभात ते बोलत होते. आज सकाळी येथील ताराराणी विद्यापीठात झालेल्या या कार्यक्रमात श्री. कानेटकर यांच्या हस्ते श्री. लोहिया यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. श्री. आप्पासाहेब जाधव यांनी मानपत्राचे वाचन केले. मदनमोहन लोहिया नागरी सत्कार समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

खरा समाजसेवक सेवाव्रतातून केव्हाही निवृत्त होत नाही, असे सांगून प्रा. कानेटकर म्हणाले, 'सत्कार व्हावयास हवीत अशी कर्तृत्ववान माणसे अंधारात राहतात, ही खेदाची बाब आहे.'

श्री. मदनमोहन लोहिया यांच्याविषयी बोलताना प्रा. कानेटकर म्हणाले, 'त्यांनी पैसाही मिळविला. परंतु दुसऱ्या बाजूने समाजावर स्वकर्तृत्वाची छापही पाडली. त्यांची नाट्यकला व मराठी भूमीवरील निष्ठा संशयातीत आहे.'

सत्काराला उत्तर देताना श्री. लोहिया म्हणाले, 'पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही. पण माझा पुनर्जन्म झाला, तर तो कोल्हापूरच्या मातीतच व्हावा. करण्यासारखी खूपच कामे अद्याप बाकी आहेत.'

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही. टी. पाटील, प्रा. अंबादास माडगूळकर, आनंदराव जाधव, जी. एन. कुलकर्णी, हरिभाऊ करपे, राजंदेकर आदींची यावेळी भाषणे झाली. श्री. गोविंदराव गुणे यांनी आभार मानले.

२ / सकाळ : शुक्रवार, १९ जानेवारी १९९०

सकाळ :